सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# सेतू अभ्यासक्रम

## (Bridge course)

**इयत्ता : तिसरी**

**विषय : परिसर अभ्यास - १**

**शैक्षणिक वर्ष २०२१-२२**



शैक्षणिक वर्ष २०२०-२१

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
महाराष्ट्र, पुणे - ३०

**श्रेयनामावली**

- प्रवर्तक - शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन
- प्रकाशक - राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे 30
- प्रेरणा - **मा. वंदना कृष्णा (भा.प्र.से.)**
  अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन
- मार्गदर्शक - **मा. विशाल सोळंकी (भा.प्र.से.)**
  आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य पुणे
  **मा. राहुल द्विवेदी (भा.प्र.से.)**
  राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
- संपादक - **मा. दिनकर टेमकर,**
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे 30
- सहसंपादक - **डॉ. विलास पाटील,**
  सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे 30
- कार्यकारी संपादक - **विकास गरड,**
  प्र प्राचार्य, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे 30
  **तेजस्विनी आळवेकर,**
  वरिष्ठ अधिव्याख्याता, विज्ञान विभाग
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे 30
  **मनिषा ताठे,**
  अधिव्याख्याता, विज्ञान विभाग
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे 30
- संपादन सहाय्य - **श्वेता दिलीप ठाकूर,**
  पर्यवेक्षिका/BOS, अण्णासाहेब वर्तक स्मारक विद्यामंदिर,गोपचर पाडा, विरार पूर्व, तालुका वसई, जिल्हा पालघर
  **रुपेश दिनकर ठाकूर,**
  सहाय्यक शिक्षक/BOS, अण्णासाहेब वर्तक स्मारक विद्यामंदिर, गोपचर पाडा, विरार पूर्व, तालुका वसई, जिल्हा पालघर
- निर्मिती सहाय्य - **अर्चना नलावडे**, अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, जिल्हा उस्मानाबाद
  **अलका अशोक पाटील**, विषय सहाय्यक, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, जिल्हा नंदूरबार
  **आशा तुकाराम वानखेडे,** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मोकरवाडी, तालुका हवेली, जिल्हा पुणे

## विद्यार्थ्यांसाठी / पालकांसाठी सूचना

नमस्कार विद्यार्थी मित्रांनो !

आपण शैक्षणिक वर्ष 2020-21 मध्ये आपल्याला नेहमीप्रमाणे शाळेत जाता आले नाही, पण आपले शिक्षक तुमच्यापर्यंत विविध माध्यमातून शिक्षण पोहोचविण्याचा प्रयत्न करीत होते. आपली नियमित शाळा भरत नव्हती तरी शिक्षण सुरूच होते. आता आपण नवीन शैक्षणिक वर्षासाठी सज्ज होत आहोत. शैक्षणिक वर्ष 2021-22 ची पूर्वतयारी तसेच मागील वर्षीच्या अभ्यासक्रमाची उजळणी व्हावी, या उद्देशाने हा सेतू अभ्यासक्रम तयार केला आहे.

1. मागील इयत्तेतील ज्या महत्त्वाच्या संकल्पनांवर या वर्षीचा पाठ्यक्रम आधारित आहे, अशाच संकल्पनांचा समावेश या सेतू अभ्यासक्रमात करण्यात आला आहे.
2. सेतू अभ्यासक्रमाचा कालावधी 45 दिवस निश्चित करण्यात आला असून त्यात तीन चाचण्यांचा समावेश आहे. या चाचण्या सेतू अभ्यासक्रमातील कृतिपत्रिकांवर आधारित आहेत.
3. सेतू अभ्यासक्रमातील प्रत्येक कृतिपत्रिका महत्त्वाच्या संकल्पना स्पष्ट करण्याच्या हेतूने तयार केली आहे.
4. कृतिपत्रिकेची रचना खालीलप्रमाणे करण्यात आली आहे :
    - **समजून घेऊ या :** कृतिपत्रिकेत समाविष्ट करण्यात आलेल्या संकल्पना येथे दिल्या आहेत.
    - **संदर्भ :** मागील वर्षीच्या पाठाचा संदर्भ देण्यात आला आहे.
    - **अध्ययन निष्पत्ती / क्षमता विधाने :** दिलेल्या कृतिपत्रिकेतून साध्य होणारी अध्ययन निष्पत्ती व विकसित होणा-या क्षमता.
    - **लक्षात घेऊ या :** संकल्पना अधिक स्पष्ट होण्यासाठी थोडक्यात स्पष्टीकरण देण्यात आले आहे. यामध्ये तक्ते, संकल्पना चित्रे, ओघतक्ता, आकृत्या, इ. चा वापर करण्यात आला आहे.
    - **सराव करू या :** समजून घेतलेल्या संकल्पना व पाठ्यांशाचा अधिक सराव होण्यासाठी ज्ञान, आकलन, उपयोजन आणि कौशल्य यांचा समतोल राखून प्रश्नांची रचना करण्यात आली आहे.
    - **अधिक अभ्यासासाठी दिक्षा लिंक्स :** कृतिपत्रिकेतील संकल्पनांचे दृढीकरण होण्यासाठी दिक्षा पोर्टलवरील संबंधित संकल्पनांच्या व्हिडिओ लिंक्स दिल्या आहेत.
5. शिक्षकांच्या मार्गदर्शनाने कृतिपत्रिका सोडवाव्यात. अभ्यासात सातत्य राहण्यासाठी पालक व विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या संपर्कात राहावे.
6. प्रत्येक कृतिपत्रिकेसाठी नेमून दिलेल्या कालावधीतच ती पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा.
7. **कृतिपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे एका स्वतंत्र वहीमध्ये सोडवून ती वही अंतर्गत मूल्यमापनासाठी जपून ठेवावी.**
8. छोट्या कृती तसेच प्रयोगांची मांडणी करण्यात आली आहे. त्या विद्यार्थ्यांनी पालक किंवा शिक्षकांच्या उपस्थितीत कराव्यात.
9. कृतिपत्रिकेच्या शेवटी दिलेल्या लिंक्सचा वापर करून विद्यार्थ्यांनी संबंधित व्हिडिओ पाहून संकल्पना अधिक चांगल्या प्रकारे समजावून घ्याव्यात.
10. कृतिपत्रिका सोडविताना काही अडचण आल्यास आपल्या पालक किंवा शिक्षकांची मदत घ्या. आम्हाला खात्री आहे की तुम्ही हा सेतू अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण करून नवीन शैक्षणिक वर्ष 2021-22 साठी आत्मविश्वासाने तयार व्हाल.

प्रामाणिकपणे आणि स्वप्रयत्नाने सेतू अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी **मन:पूर्वक शुभेच्छा** !

## शिक्षकांसाठी सूचना

शैक्षणिक वर्ष 2020-21 मध्ये उद्भवलेल्या कोरोना विषाणू प्रादुर्भावाच्या जागतिक संकटामुळे प्रत्यक्ष वर्ग अध्यापनामध्ये अनेक अडचणी आल्या. आपण सर्वांनी विविध माध्यमांचा वापर करून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला. त्यात आपल्याला उत्तम यशही मिळाले. परंतु प्रत्यक्ष अध्यापन होत नसल्याने त्या प्रयत्नांनाही अनेक मर्यादा येत होत्या. अद्यापही संकट पूर्णपणे टळलेले नाही. शैक्षणिक वर्ष 2021-22 मध्ये शाळा सुरु होण्याबाबत प्रश्नचिन्ह आहे. आपल्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष 2020-21 मध्ये केलेल्या अध्ययनाची उजळणी होणे आवश्यक आहे, तसेच वर्तमान शैक्षणिक वर्षाच्या अभ्यासक्रमाची पूर्वतयारी होण्याच्या उद्देशाने हा सेतू अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे.

1. सेतू अभ्यासक्रम 45 दिवसांच्या कालावधीत पूर्ण करून घ्यायचा आहे.
2. या सेतू अभ्यासक्रमात मागील वर्षाच्या अत्यंत महत्त्वाच्या संकल्पनांचा समावेश करून कृतिपत्रिका स्वरूपात मांडण्यात आल्या आहेत.
3. प्रत्येक कृतिपत्रिका तयार करताना सहज उपलब्ध होणाऱ्या साहित्याचा वापर करून विद्यार्थ्यांना सहज करता येतील अशा कृती, छोटे प्रयोग यांची मांडणी करण्यात आली आहे.
4. कृतिपत्रिकेची रचना व्यवस्थित समजावून घ्या, म्हणजे त्या सोडवून घेणे सुलभ होईल.
    - **समजून घेऊ या :** मागील वर्षीच्या पाठाशी संबंधित कृतिपत्रिकेत समाविष्ट करण्यात आलेल्या महत्त्वाच्या संकल्पना येथे दिल्या आहेत. या वर्षी ज्या संकल्पना विस्तारित झाल्या आहेत, अशा गेल्या वर्षीच्या संकल्पनांवर जास्त भर देण्यात आलेला आहे.
    - **संदर्भ :** मागील वर्षीच्या पाठाचा संदर्भ देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना संदर्भासाठी मागील वर्षीचे पाठ्यपुस्तक वापरण्यासंबंधी सूचना द्याव्यात.
    - **अध्ययन निष्पत्ती / क्षमता विधाने :** दिलेल्या कृतिपत्रिकेतून साध्य होणारी अध्ययन निष्पत्ती व विकसित होणा-या क्षमता यांचा समावेश करण्यात आलेला आहे. कृतिपत्रिका सोडवून घेताना अध्ययन निष्पत्ती साध्य होण्याकडे, तसेच संबंधित क्षमता विकसित होण्याकडे लक्ष द्यावे.
    - **लक्षात घेऊ या :** संकल्पना अधिक स्पष्ट होण्यासाठी थोडक्यात स्पष्टीकरण देण्यात आले आहे. यामध्ये तक्ते, संकल्पना चित्रे, ओघतक्ते, आकृत्या, इ. चा वापर करण्यात आला आहे. येथे आपण इतरही विविध अध्ययन अनुभवांची रचना करू शकता. महत्त्वाचे मुद्दे आणि संक्षिप्त माहिती आपले अध्यापन सुलभ होण्यासाठी देण्यात आली आहे. आपण आपल्या उपलब्ध वेळनुसार त्या संकल्पनांच्या स्पष्टीकरणात भर घालू शकता.
    - **सराव करू या :** समजून घेतलेल्या संकल्पनाचा, पाठ्यांशाचा अधिक सराव होण्यासाठी ज्ञान, आकलन, उपयोजन आणि कौशल्य यांचा समतोल राखून प्रश्नांची रचना करण्यात आली आहे. प्रत्येक कृतिपत्रिकेतील सराव प्रश्न स्वतंत्र वहीत विद्यार्थ्यांकडून लिहून घ्यावेत. यामुळे उजळणीसोबतच लेखनसरावही होईल. सेतू अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर या वह्या जमा करून ठेवाव्यात.
    - **अधिक अभ्यासासाठी दिक्षा लिंक्स :** कृतिपत्रिकेतील संकल्पनांचे दृढीकरण होण्यासाठी दिक्षा पोर्टलवरील संबंधित संकल्पनांच्या व्हिडिओ लिंक्स दिल्या आहेत. या लिंकवरील व्हिडिओ विद्यार्थ्यांना घरी पाहण्यासंबंधीच्या सूचना द्याव्यात.
5. वर्तमान इयत्तेतील विविध संकल्पना समजून घेण्यासाठी, विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान जागृत करण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांच्या अध्ययनाचा आढावा घेण्यासाठी हा सेतू अभ्यासक्रम उपयुक्त ठरणार आहे.

6. अनुक्रमणिकेत दिलेल्या नियोजनानुसार कृतिपत्रिका काटेकोरपणे सोडवून घ्याव्यात.
7. सेतू अभ्यासक्रमातील कृतिपत्रिका विद्यार्थी प्रामाणिकपणे व स्वप्रयत्नाने सोडवतील याकडे शिक्षकांनी लक्ष असावे, विद्यार्थ्यांच्या अडचणी समजून घेऊन योग्य ती मदत करावी.
8. ठराविक घटकांची उजळणी झाल्यानंतर देण्यात आलेल्या चाचण्या विद्यार्थ्यांकडून सोडवून घ्याव्यात. चाचण्या तपासून त्यांना योग्य निकषांचा अवलंब करून गुणदान करावे व गुणांची नोंद करून ठेवावी.
9. प्रत्येक चाचणीचे मूल्यमापन झाल्यानंतर ज्या विद्यार्थ्यांना उपचारात्मक अध्यापनाची आवश्यकता आहे, त्या विद्यार्थ्यांना योग्य असे मार्गदर्शन करावे. याप्रमाणे तीनही चाचण्यांची अंमलबजावणी करावी.
10. हा 45 दिवसांचा सेतू अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर आपल्या नियमित अभ्यासक्रमाच्या अध्यापनास सुरुवात करावी.

**शैक्षणिक वर्ष 2021-22 साठी मनःपूर्वक शुभेच्छा !**

**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे - ३०**

**पूर्वतयारी सेतू अभ्यासक्रम**

**इयत्ता तिसरी**

**विषय - परिसर अभ्यास भाग १**

**अनुक्रमणिका**


| कृतिपत्रिका क्रमांक | कृतिपत्रिकेतील घटकाचे नाव |
|---|---|
| **दि. १५ जून ते ३० जून २०२१** | |
| १ | माझा आहार |
| २ | प्रथमोपचार |
| ३ | स्वच्छता |
| ४ | शरीराचे अवयव |
| ५ | परिसर |
| ६ | परिसरातील उद्योग |
| ७ | परिसरातील व्यवसाय |
| **चाचणी १ (कृतिपत्रिका क्र. १ ते ७ वर आधारित)** | |
| **दि. १ जुलै ते १५ जुलै २०२१** | |
| ८ | पाण्याचे उपयोग |
| ९ | पाणी साठवण्याची साधने |
| १० | आपत्ती व्यवस्थापन |
| ११ | परिसरातील फळे |
| १२ | आपले कपडे |
| १३ | परिसरातील फुले |
| १४ | प्राणी व त्यांचे उपयोग |
| **चाचणी २ (कृतिपत्रिका क्र.८ ते १४ वर आधारित)** | |
| **दि. १६ जुलै ते ३० जुलै २०२१** | |
| १५ | निवारा |
| १६ | माहिती व संप्रेषण साधने |

| | |
|---|---|
| १७ | वाहतुकीची साधने |
| १८ | वाढ |
| १९ | परिसरातील वनस्पती व पिके |
| २० | दिनदर्शिका |
| २१ | गावाची ओळख |
| २२ | आपला भारत |
| **चाचणी ३ (संपूर्ण सेतू अभ्यासक्रमावर आधारित)** | |

### राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे – ३०

**इयत्ता : तिसरी** **पूर्वतयारी सेतू अभ्यासक्रम** **विषय : परिसर अभ्यास**

**कृतिपत्रिका : ०१**

**समजून घेऊ या :** आहार, अन्नाचे महत्व, घ्यावयाची काळजी.

**संदर्भ :** इयत्ता दुसरी १.३. माझा आहार (इयत्ता दुसरीच्या खेळू, करू, शिकू या पाठ्यपुस्तकातील पृ.क्र.४)

**अध्ययन निष्पत्ती :** अन्न, वस्त्र, निवारा यांच्याशी संबंधित उपक्रमात सहभागी होतो.

**लक्षात घेऊ या :**

आपण दिवसभरात जे अन्नपदार्थ खातो, जे पेयपदार्थ पितो त्या सर्वांना मिळून **आहार** असे म्हणतात.



आपल्या जेवणात भाजी, पोळी किंवा भाकरी वरण-भात असे पदार्थ असतात. आपण सर्व प्रकारच्या भाज्या आवडीने खाल्ल्या पाहिजेत.



आपल्या जेवणात पालेभाज्यांचाही समावेश असावा.



आपण विविध प्रकारची फळे देखील खाल्ली पाहिजे.



याच बरोबर भरपूर पाणी प्यावे यामुळे अन्नाचे पचन होते.

**अन्नाचे महत्व :**

- अन्नामुळे आपल्या शरीराची वाढ होते व काम करण्याची शक्ती मिळते.
- आपली हाडे बळकट होतात .
- अन्नामुळे रक्त तयार होते.

**घ्यावयाची काळजी :**




पिझ्झा, बर्गर, वडापाव यासारखे पदार्थ नेहमी खाऊ नयेत.




तसेच चहा, कॉफी, शीतपेये नेहमी पिऊ नये.

आपले शरीर तंदुरुस्त राहण्यासाठी योग्य आहार, नियमित व्यायामाची गरज आहे. यामुळे शरीराची वाढही चांगली होते.

**सराव करु या :**

प्रश्न १) ठळक अक्षरातील चुकीचे शब्द खोडा.

१) फळे आपण **शिजवून / न शिजवता** खातो.

२) काकडी आपण **तळून / कच्ची** खातो.

३) **पोळी / भजी** तव्यावर भाजतात.

प्रश्न २) खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.

१)आरोग्य चांगले राहण्यासाठी सोनूने पुढीलपैकी काय खावे?

अ) बिस्किटे ब) तेलकट पदार्थ क) फळे ड) पिझ्झा

२) पुढीलपैकी पालेभाजी कोणती?

अ) वाटाणा ब) चवळी क) पालक ड) बटाटा

३)कोणत्या धान्याला मोड आणून उसळ तयार करतात?

अ) गहू ब) बाजरी क) मटकी ड) मका

प्रश्न ३) चूक की बरोबर ते लिहा.

१) घरी केलेला प्रत्येक पदार्थ आवडीने खावा. ----------------------------

२) उघड्यावरील व न झाकलेले पदार्थ खावेत. ----------------------------

३) चॉकलेट, वेफर्स, आईस्क्रीम यासारखे पदार्थ नियमित खावेत. ----------------------------

**अधिक अभ्यासासाठी लिंक्स :**

https://diksha.gov.in/dial/U2L1DE

## कृतिपत्रिका : ०२

**समजून घेऊ या** - प्रथमोपचार पेटीतील साहित्याची ओळख आणि उपयोग.

**संदर्भ :** प्रथमोपचार, (इयत्ता दुसरीच्या **'खेळू, करू, शिकू'** या पाठ्यपुस्तकातील पृ.क्र. ५)

**अध्ययन निष्पत्ती :** आरोग्याच्या चांगल्या सवयी समजून घेऊन त्यांचे पालन करतो.

**लक्षात घेऊ या :**



वरील चित्रातील सोनू सायकल चालवताना पडला. त्याच्या पायाला खरचटले. तो लगेच दवाखान्यात जाईल का? कारण सांगा.

--------------------------------------------------------------------------------

त्याने काय उपचार करावा, असे तुम्हाला वाटते?

--------------------------------------------------------------------------------

आपल्या घरी किंवा शाळेत काम करत असताना एखाद्याला काही दुखापत झाली, लागलं, कापलं किंवा खरचटले अशावेळी आपण प्रथमोपचार पेटीचा वापर करतो.त्यानंतर अधिक दुखापत झाली असल्यास दवाखान्यात जातो.



**प्रथमोपचार पेटीतील साहित्य :**

**कापूस :** जखम झालेल्या अथवा कापलेल्या जागी रक्त येत असल्यास कापसाचा उपयोग होतो. कापूस ठेवून चिकटवण्यासाठी चिकटपट्टीचा उपयोग होतो.




**पट्टी :** जखमेवर बांधण्यासाठी चित्रात दाखविलेल्या जाळीदार, मऊ कापडी पट्टीचा उपयोग होतो.



**शाळेत जशी प्रथमोपचार पेटी असते तशी आपल्या घरी देखील असावी.**

**सराव करु या :**

१) तुमचा मित्र किंवा मैत्रीण सायकलवरून पडली आणि तिच्या पायाला खूप लागलं तर तुम्ही काय कराल?

--------------------------------------------------------------------------

२) पुढील प्रसंगी तुम्ही कोणता घरगुती उपाय कराल?

अ) डोके दुखत आहे.

--------------------------------------------------------------------------

ब)सर्दी झाली आहे.

--------------------------------------------------------------------------

क)उलट्या होत आहेत.

--------------------------------------------------------------------------

**अधिक अभ्यासासाठी लिंक्स**

https://diksha.gov.in/play/content/do_31293156067886694411O

## कृतिपत्रिका : ०३

**समजून घेऊ या :** घराची स्वच्छता, परिसर स्वच्छता, सुका व ओला कचरा, वैयक्तिक स्वच्छता व त्याचे महत्त्व.
**संदर्भ :** इयत्ता दुसरी १.६. स्वच्छता (इयत्ता दुसरीच्या '**खेळू, करू, शिकू**' या पाठ्यपुस्तकातील पृ.क्र.६)
**अध्ययन निष्पत्ती :** आरोग्याच्या चांगल्या सवयी समजून घेऊन त्यांचे पालन करतो.
**लक्षात घेऊ या :**
दिलेल्या चित्रांचे निरीक्षण करून प्रश्नांची उत्तरे लिहा.


नीटनेटके घर          पसारा असलेले घर

तुम्हाला वरीलपैकी कोणत्या घरात राहायला आवडेल?
------------------------------------------------------------------------
आपले घर स्वच्छ राहण्यासाठी कोणती कामे करावी लागतात?
------------------------------------------------------------------------

आपले घर स्वच्छ व नीटनेटके असेल तर आपल्याला छान वाटते.
वस्तू योग्य जागी सापडतात. घरात स्वच्छता राखणे ही कुटुंबातील प्रत्येकाची जबाबदारी आहे.
घरातील केरकचरा इकडे-तिकडे फेकू नये, तो कचरापेटीत टाकावा.
कचरा घराच्या बाहेर फेकू नये. यामुळे परिसर स्वच्छ राहतो.


कचरा कुंडी

ओला कचरा व सुका कचरा, वेगवेगळ्या कचरापेटीत टाकावा.



आपण आपला परिसरही स्वच्छ ठेवला पाहिजे. यामुळे विविध आजार व रोगजंतू यापासून आपले रक्षण होते.

उघड्यावर शौचास जाऊ नये.
याकरिता स्वच्छतागृहाचा वापर करावा.

याच प्रमाणे आपण वैयक्तिक स्वच्छता ही ठेवली पाहिजे.

याकरिता दररोज अंघोळ केली पाहिजे.



त्वचा, डोळे व नाक यांची स्वच्छता राखली पाहिजे. दररोज केस विंचरावे.आठवड्यातून निदान एकदा तरी केस धुतले पाहिजे.



नियमित नखे कापली पाहिजे.



सकाळी झोपून उठल्यावर व रात्री झोपण्याअगोदर दोन वेळा दात स्वच्छ घासले पाहिजे.



घाणेरड्या हातांनी खाल्ले तर ती घाण पोटात जाते,पोट बिघडते. म्हणून जेवण्याअगोदर व जेवणानंतर तसेच मलमूत्र विसर्जनानंतर हात स्वच्छ धुवावेत.



बाजूच्या चित्रात दाखविल्याप्रमाणे हात स्वच्छ धुवावेत. त्याकरीता खालील साधनांचा वापर करावा.

  

स्वच्छता ठेवली नाही तर वेगवेगळे आजार होऊ शकतात.

**सराव करु या.**

प्रश्न १) उत्तरे लिहा.

१) शाळेचा परिसर स्वच्छ करण्याकरिता तुम्ही कोणत्या साहित्याचा वापर कराल?

---------------------------------------------------------------------

२) राजूला दात घासायचे आहेत. त्यासाठी तो कोणत्या साधनांचा वापर करेल?

---------------------------------------------------------------------------------

प्रश्न २) योग्य-अयोग्य ते लिहा.

१) कचरा कचरापेटीत टाकू नये. --------------------------------

२) नखे नियमित कापावी. --------------------------------

३) परिसर स्वच्छ ठेवावा. --------------------------------

४) सकाळी उशिरा उठावे. --------------------------------

५) आईला घरकामात मदत करावी. --------------------------------

प्रश्न ३) उदाहरणे लिहा.

१) ओला कचरा ----------------------------------------------------------------

२) सुका कचरा ----------------------------------------------------------------

**अधिक अभ्यासासाठी लिंक :**

https://diksha.gov.in/dial/U2L1DE

## कृतिपत्रिका : ०४

**समजून घेऊ या :** अवयवांची ओळख त्यांची कार्य अवयवांचा वापर.

**संदर्भ :** १.७ शरीराचे अवयव(इयत्ता दुसरीच्या **'खेळू, करु, शिकू'** या पाठ्यपुस्तकातील पृ.क्र.७)

**अध्ययन निष्पत्ती :** आरोग्याच्या चांगल्या सवयी समजून घेऊन त्यांचे पालन करतो.

**लक्षात घेऊ या :**



चित्रातील मुलगा खेळताना शरीराच्या कोणकोणत्या भागांचा वापर करीत आहे?

-----------------------------------------------------------------------------

विविध कामे करताना आपल्याला शरीराच्या भागांचा वापर करावा लागतो. या शरीराच्या भागांना **अवयव** म्हणतात. कान, नाक, हात, पाय हे आपले अवयव आहेत.

डोळ्यांमुळे आपण पाहू शकतो.



नाकामुळे आपण श्वास व वास घेऊ शकतो.



कानांमुळे आपल्याला ऐकायला येते.



एखादी कृती करताना आपल्याला एका वेळी अनेक अवयवांचा वापर करावा लागतो.

समजा रोहनला सायकल चालवायची आहे, तर त्याला डोळे, कान, हात व पाय या अवयवांचा वापर करावा लागेल.

आपण सर्व कामे शरीराच्या मदतीने करतो.

**घ्यावयाची काळजी:**

आपण आपल्या शरीराची काळजी घ्यायला हवी.

विविध हालचाली व कृती करतांना शरीर स्थिती योग्य असावी.

लिहितांना, वाचतांना, बाकावर बसताना ताठ बसावे.




पाठीत वाकून बसू नये. ताठ बसावे.



पाठीत पोक काढून उभे राहू नये.
ताठ उभे राहावे. ताठ चालावे.



**वाईट सवयींना प्रतिबंध :**

काही सवयी वाईट आहेत. त्या टाळाव्यात. मोबाईल, टीव्ही, व्हिडिओगेम, संगणक यांचा अतिवापर करू नये.

  

वरील वस्तूंच्या अतिवापराने डोळ्यांवर दुष्परिणाम होतो. म्हणून या वस्तू खूप वेळ पाहू नये. यावर खेळण्यात वेळ घालवू नये. टीव्ही जवळून पाहू नये.

**सराव करु या :**

प्रश्न १) पुढील माहिती कोणत्या अवयवामुळे कळते ते लिहा.

१) फूल पिवळे आहे. ----------------------------

२) अत्तराचा वास चांगला आहे. ----------------------------

३) बाहेर कोकीळ गात आहे. ----------------------------

प्रश्न २) खालील कृती करतांना कोणकोणत्या अवयवांचा उपयोग होतो ते लिहा.

१) विटीदांडू खेळताना ----------------------------

२) कपडे धुतांना ----------------------------

प्रश्न ३) पुढील पदार्थांचा रंग कोणता असतो ते लिहा.

१) हळद ----------------------------

२) मीठ ----------------------------

३) पिकलेली मिरची ----------------------------

**अधिक अभ्यासासाठी लिंक्स:**

https://diksha.gov.in/dial/U2L1DE

## कृतिपत्रिका : ०५

**समजून घेऊ या :** आपला परिसर.

**संदर्भ :** कार्यजगत( इयत्ता दुसरीच्या **खेळू, करु, शिकू** या पाठ्यपुस्तकातील पृ.क्र. ३३)

**अध्ययन निष्पत्ती :** परिसरातील वस्तू, साधने, स्थाने यांचे प्रकार, घर, शाळा इत्यादी ठिकाणी घडणारे उपक्रम ओळखतो.

**लक्षात घेऊ या :**

**आपला परिसर**

आपल्या आसपास म्हणजे परिसरात. परिसर म्हणजे आपल्या आजूबाजूला.आपल्या आजूबाजूला अनेक वस्तू आहेत.

डोंगर, नद्या, माती, दगड, हवा, फळे, फुले आहेत.



हवा दिसत नाही. परंतु ती सगळीकडे असते. हे कळण्यासाठी पुढील कृती करा.

एक पंखा किंवा पुठ्ठा घ्या तो जोराने हलवा हलणारी हवा आपणास लागते. यावरुन आपल्या आजूबाजूला हवा आहे हे समजते.



आपल्याला हवेची गरज असते.
सर्व प्राण्यांना, वनस्पतींनाही हवेची गरज असते.

झाडे, वेली, प्राणी, पक्षी आहेत. आपलाही समावेश या परिसरातच होतो.



**सराव करु या :**

१) तुमच्या परिसरात आढळणाऱ्या वस्तूंची यादी करा.

-----------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------

२) तुमच्या वर्गखोली मध्ये कोणकोणत्या वस्तू असतात?

३) खालील चित्राचे निरीक्षण करा. त्याठिकाणी तुम्ही आहात असे समजून तुमच्या परिसरात कोणकोणत्या वस्तू असतील त्यांची नावे लिहा.



४) कोणत्याही एका झाडाचे चित्र काढून त्याला रंग द्या.

५) चित्रातील फुगेवाला फुग्यात काय भरत आहे?



६) चित्रातील कपडे कशामुळे उडत आहेत? हे कपडे जमिनीवर पडू नये म्हणून तुम्ही काय कराल?



७) पुढील वस्तू कोणत्या पदार्थापासून बनल्या आहेत ते त्यापुढे लिहा.



अ) ---------------------------



ब) ----------------------------



क) ----------------------------



ड) ----------------------------



ई) -----------------------------



फ) -----------------------------

७) साबणाचे पाणी बनवा. त्यापासून साबणाचे फुगे तयार करा.

**अधिक अभ्यासासाठी लिंक :**

https://diksha.gov.in/play/content/do_3129315732919336961100
https://diksha.gov.in/play/content/do_3129273693367746561 4979

## कृतिपत्रिका : ०६

**समजून घेऊ या :** परिसरातील उद्योगांची ओळख.

**संदर्भ :** इयत्ता दुसरीच्या **'खेळू, करु, शिकू'**या पाठ्यपुस्तकातील पृ.क्र. ३३, ३४

**अध्ययन निष्पत्ती:** परिसरातील लघु उद्योगाची माहिती सांगतो.

**लक्षात घेऊ या :**

अन्न, वस्त्र आणि निवारा या आपल्या गरजा आहेत. यासोबतच आपल्याला कपडे लागतात, दूध लागते, अभ्यास करण्यासाठी शिक्षक ही लागतात. आपल्या विविध गरजा पुरवण्यासाठी वेगवेगळे लोक काम करतात. आपल्या परिसरात लोक वेगवेगळ्या प्रकारचे कामे करतात.

तुमचे वडील काय काम करतात?

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

मोठेपणी तुम्हाला काय व्हायचे आहे?

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

परिसरातील विविध उद्योग तुम्ही नक्कीच पाहिले असतील.

**हातमाग उद्योग :**

या उद्योगांमध्ये हाताच्या साह्याने कापड विणले जाते.



**यंत्रमाग उद्योग :**

यंत्रमाग उद्योग म्हणजे यंत्राच्या साह्याने कापड विणणे.



**वर्तमानपत्र विक्रेता :** सर्व प्रकारची वर्तमानपत्रे विकणाऱ्या व्यक्तीला आपण वर्तमानपत्र विक्रेता असे म्हणतो.



**फळ विक्रेता :**

विविध फळे विकणाऱ्या व्यक्तीला आपण फळविक्रेता म्हणतो.



**पापड, लोणचे उद्योग :** या उद्योगात विविध प्रकारचे पापड,लोणचे तयार करून विकली जातात.



**हारफुले विक्रेता :** या उद्योगात हारफुल विक्रेता विविध प्रकारची फुले त्याचप्रमाणे फुलांचे हार, गुच्छ बनवून विकत असतात.



**मातकाम :** या उद्योगात मातीपासून विविध प्रकारची भांडी बनवली जातात. उदा. मडकी, कुंड्या, माठ इत्यादी.



**शिवणकाम :** या उद्योगातील व्यक्ती वेगवेगळ्या प्रकारचे कपडे शिवत असतात. त्या व्यक्तीला आपण शिंपी म्हणतो. उदा. फ्रॉक, शर्ट इत्यादी.



**चावी तयार करणे :** या उद्योगात सर्व प्रकारच्या कुलपाच्या चाव्या तयार केल्या जातात. चुकीने आपल्या घरातील कुलपाची चावी आपल्याकडून हरवल्यास आपण या लोकांकडून नवीन चावी तयार करून घेत असतो.



**सराव करुया :**

१) तुमच्या परिसरातील उद्योगधंद्यांची नावे लिहा.

-----------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

२) तुमच्या गावातील शिवणकाम करणाऱ्या उद्योगाला भेट देऊन त्यासाठी काय काय साहित्य लागते याची माहिती गोळा करा.

----------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------

३) तुमच्या सायकलच्या कुलपाची चावी हरवली तर तुम्ही काय कराल ?

----------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------

४) माती पासून वेगवेगळी फळे तयार करून त्याला रंग द्या.

**अधिक अभ्यासासाठी लिंक**

https://diksha.gov.in/play/collection/do_31283031289393152019576?referrer=utm_source%3Dmobile%26utm_campaign%3Dshare_content&contentId=do_31292736365939916814955

**कृतिपत्रिका : ०७**

**समजून घेऊ या :** परिसरातील व्यवसाय.

**संदर्भ :** कोण काय करतो? (इयत्ता दुसरी बालभारती पाठ क्रमांक २१)

**अध्ययन निष्पत्ती :** अन्न, वस्त्र,निवारा यांच्याशी संबंधित उपक्रमात सहभागी होतो.

**लक्षात घेऊ या :**

आपल्या परिसरात लोक वेगवेगळे काम करतात. त्यांच्या कामांना **व्यवसाय** म्हणतात.

**शेतकरी :** शेतकरी शेतात काम करतात त्यामुळे सर्व लोकांना अन्न मिळते.



**सैनिक :** सैनिक आपल्या देशाचे रक्षण करतात.



**डॉक्टर :** डॉक्टर आजारी लोकांना तपासतात.



**शिक्षक :** शिक्षक विद्यार्थ्यांना शिकवितात.




**पोस्टमन :** पोस्टमन पत्र, डाक, तार इ.दिलेल्या पत्त्यावर पोहचवितात.



**परिचारिका:** परिचारिका रुग्णांची सेवा करतात.



**सराव करू या :**

प्रश्न १) तुमच्या परिसरातील लोक कोण कोणत्या प्रकारची कामे करतात?

-------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------

प्रश्न २)आपल्याला अन्नधान्य कोणामुळे मिळते ?

-------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------

प्रश्न ३) कोण काय करते?

१) डॉक्टर ----------------------------------------

२) सैनिक ----------------------------------------

३) शिक्षक ----------------------------------------

४) पोस्टमन ----------------------------------------

**अधिक अभ्यासासाठी लिंक :**

https://diksha.gov.in/play/content/do_3128820156368814081839

**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे ३०**

**पूर्वतयारी सेतू अभ्यासक्रम चाचणी : ०१** **गुण : १०**

**इयत्ता : तिसरी** **विषय : परिसर अभ्यास भाग १** **वेळ : ३० मिनिटे**

**प्रश्न १) काय करावे बरे?** **गुण २**

१)केशव मैदानावर खेळायला जात नाही.

२)राजू घरी नेहमी मोबाईल खेळतो.

**प्रश्न २) जोड्या लावा.** **गुण २**

१)  प्रथमोपचार पेटी

२)  ऐकणे

**प्रश्न ३) ठळक अक्षरातील नको ते शब्द खोडा.** **गुण २**

१) नेहमी **लवकर / उशिराने** उठावे.

२) वाढलेले सर्व अन्न **खावे / खाऊ नये.**

**प्रश्न ४) चांगले की वाईट ते लिहा.** **गुण २**

१) सचिन हात न धुता जेवायला बसतो.

२) सपना नियमित व्यायाम करते.

**प्रश्न ५) आमच्यातील वेगळा घटक ओळखा.** **गुण २**

१) , , 

२) 

, , 

* * *

# कृतिपत्रिका : ०८

**समजून घेऊ या :** पाण्याचे उपयोग.

**संदर्भ :** इयत्ता दुसरीच्या **'खेळू, करू, शिकू'** या पाठ्यपुस्तकातील पृ.क्र. ३६, ३७.

**अध्ययन निष्पत्ती :** पाण्याचे विविध उपयोग सांगतो. पाण्याविषयी बडबड गीते, गोष्ट, पाणी साठवण्याची साधने सांगतो व चित्रे रंगवितो.

**लक्षात घेऊ या :**

१) सकाळी उठल्यावर सगळ्यात पहिले तुम्ही काय करता?

------------------------------------------------------------------

२) त्यासाठी तुम्हाला कशाची गरज लागते?

------------------------------------------------------------------

दिवसभरात आपण वेगवेगळी कामे करीत असतो.

त्यासाठी आपल्याला पाण्याची गरज लागते.

**पाण्याचे उपयोग:**

पिण्यासाठी पाणी लागते.



अंघोळीसाठी पाणी लागते.



स्वयंपाकासाठी पाणी हवे असते.



शेतातील पिकांच्या वाढीसाठी पाणी पाहिजे असते.



कारखानदारीसाठी देखील माणसाला पाणी लागते.



बरं ! फक्त मनुष्याला पाण्याची गरज असते का?

--------------------

प्राण्यांना आणि वनस्पतीलाही पाण्याची गरज असते.



प्राण्यांना पाण्याची गरज असते.



वनस्पतींना वाढीसाठी पाणी आवश्यक आहे.

माणसाच्या जीवनात पाणी खूप गरजेचे आहे. त्यामुळेच पाण्याला जीवन असे म्हणतात. म्हणूनच आपण पाणी जपून वापरले पाहिजे.

**सराव करू या :**

१) पाणी पिण्यासाठी प्राणी कोठे जातात?

…………………………………………………………………………………………………………….

२) उन्हाळ्यात पक्ष्यांना  पिण्यासाठी पाणी मिळावे यासाठी तुम्ही काय करता?

……………………………………………………………………………………………………………

३) घरातील पाणी स्वच्छ राहावे यासाठी तुम्ही कोणते प्रयत्न करता?

……………………………………………………………………………………………………………

४) पाण्याची बचत व्हावी यासाठी तुम्ही कोणते प्रयत्न कराल?

…………………………………………………………………………………………………………..

**अधिक अभ्यासासाठी लिंक-**

https://diksha.gov.in/play/content/do_31292736365939916814955

## कृतिपत्रिका : ०९

**समजून घेऊ या :** पाण्याचे उपयोग, पाणी साठवण्याची साधने.

**संदर्भ :** पाणी साठवण इयत्ता दुसरी च्या **'खेळू, करू, शिकू'** या पाठ्यपुस्तकातील पृ. क्र.३६,३७.

**अध्ययन निष्पत्ती:** पाण्याचे विविध उपयोग सांगतो पाण्याविषयी बडबड गीते,गोष्ट पाणी साठवण्याची साधने सांगतो व चित्र रंगवितो.

**लक्षात घेऊ या:**

पाण्याचे उपयोग : दैनंदिन जीवनात विविध कामे करण्यासाठी आपल्याला पाण्याची गरज असते. [पिण्यासाठी, अंघोळीसाठी, भांडी व कपडे धुण्यासाठी]



**पाणी साठविण्याची साधने** : आपल्याला पावसापासून पाणी मिळते.हे पाणी साठवून ठेवले नाही तर आपल्याला पुरेसे पाणी मिळणार नाही, म्हणून पाणी साठवावे लागते.

**धरण**



नदीतील पाणी अडविण्याकरिता धरण बांधले जाते व पाणी साठवले जाते

**सार्वजनिक पाण्याची टाकी**




एखाद्या भागातील सर्व घरांना पाणीपुरवठा व्हावा याकरिता त्या भागात उंचावर सिमेंटची पाण्याची टाकी बांधली जाते. ज्यात पाणी साठवले जाते.

घरगुती पाण्याची टाकी



घरात विविध कामे करण्याकरिता पाणी साठविण्यासाठी छतावर पाण्याच्या टाकीचा उपयोग केला जातो. आपल्याला सतत पाण्याची गरज पडत असते. गरजेनुसार पाणी मिळावे म्हणून आपण घरात पाणी साठवून ठेवतो.

खालील चित्रात पाणी साठवण्याची भांडी दाखवली आहेत.



आपण पाणी जपून वापरले पाहिजे.पाण्याची योग्यप्रकारे साठवणूक केली पाहिजे. पिण्याचे पाणी झाकून ठेवावे. पिण्याचे पाणी घेण्यासाठी ओगराळ्याचा वापर करावा.



**सराव करू या :**

प्रश्न १) उत्तरे लिहा.

१) उन्हाळ्यात प्राणी,पक्षी यांना पाणी मिळण्यासाठी तुम्ही कोणते उपाय कराल?

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

२) तुमच्या घरी पाणी कशामध्ये साठवले जाते?

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

३) जंगलातील प्राणी पाणी पिण्यासाठी कोठे जात असतील?

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

प्रश्न २) खालील चित्र कशाचे आहे ते ओळखा.

अ) 

------------------------

------------------------

ब) 

------------------------

------------------------

क) 

------------------------

------------------------

प्रश्न ३) पाण्यावर आधारित एखादे बडबडगीत पाठ करा.

प्रश्न ४) खालील चित्राला रंग द्या.




**अधिक अभ्यासासाठी लिंक:**

https://diksha.gov.in/play/content/do_3129273636593991681495

## कृतिपत्रिका : १०

**समजून घेऊ या :** नैसर्गिक घटक,नैसर्गिक घडामोडी.

**संदर्भ :** आपत्ती व्यवस्थापन (इयत्ता दुसरीच्या '**खेळू, करू, शिकू**' या पाठ्यपुस्तकातील पृ.क्र. ३८)

**अध्ययन निष्पत्ती :** भूकंप, पूर त्सुनामी, वणवा, वीज कोसळणे या आपत्तींची चित्रे ओळखतो.

**लक्षात घेऊ या :**



आपल्या परिसरात विविध घटना घडत असतात. दररोज सूर्य उगवतो. सूर्य उगवतो त्यास **सूर्योदय** म्हणतात. सूर्य उगवला की **दिवस** सुरु होतो.



आपण सर्व जमिनीवर राहतो म्हणजेच पृथ्वीवर राहतो. पृथ्वीवर लहान-मोठ्या टेकड्या आहेत, डोंगर आहेत, मोठमोठी मैदाने आहेत.



दररोज सूर्य मावळतो. सूर्य मावळतो त्यास **सूर्यास्त** असे म्हणतात.



सूर्य मावळला की **रात्र** सुरु होते.
रात्री आकाशात चंद्र दिसतो, चांदण्याही दिसतात.



बऱ्याच वेळा काही दुर्घटना घडतात, महाभयानक संकट येते. ज्यात अनेक माणसे जखमी होतात, काहींचा मृत्यू होतो. जनावरे मरण पावतात. शेतातल्या पिकांचा नाश होतो. खूप नुकसान होते.

## नैसर्गिक आपत्ती (संकटे) :

### भूकंप



जमिनीच्या पोटात काही हालचाली होतात.त्यामुळे जमीन हलते. घरे कोसळतात.

### वणवा



झाडांच्या फांद्या एकमेकांना घासून आग लागते.

### वीज कोसळणे



पावसाळ्यात वीज कोसळते, ज्यामुळे माणसे, जनावरे मरण पावतात.

### दुष्काळ



पाणी न मिळाल्याने जमीन कोरडी पडते. झाडे सुकतात.

### त्सुनामी



समुद्रात भूकंप येतो. प्रचंड लाटा तयार होतात. या लाटांना त्सुनामी असे म्हणतात.

### वादळ



अचानक जोरात वारा वाहू लागतो.सोबत घरे, जनावरे, माणसे, गाड्या वाहून नेतो.

### पूर



पावसाळ्यात सतत पाऊस पडल्याने नदीचे पाणी वाढते. याला आपण नदीला पूर येणे असे म्हणतो. भूकंप, पूर, त्सुनामी, वणवा आणि वीज कोसळणे यासारख्या दुर्घटना नैसर्गिक कारणांमुळे घडतात. यामुळे खूप नुकसान होते.

**सराव करू या !**

प्रश्न १) उत्तरे लिहा.

१) तुमच्या गावात पाण्याची कमतरता आहे. अशा वेळी तुम्ही काय कराल?

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

२) पुराच्या पाण्यात तुम्ही पोहणार का? कारण सांगा.

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

प्रश्न २) चूक की बरोबर ते लिहा.

१) पूर आल्यावर नदीचे पाणी कमी होते. ------------------------

२) दुष्काळ पडल्यावर जमीन कोरडी होते. ------------------------

३) जमीन हलते यास वणवा असे म्हणतात. ------------------------

४) वीज कोसळल्यावर कोणतेही नुकसान होत नाही. ------------------------

५) वादळात घरे, गाड्या, माणसे वाहून जातात. ------------------------

प्रश्न ३) डोंगर, सूर्य, चंद्र, तारे, झाड, नदी यापैकी कोणतेही घटक निवडून चित्र काढा व रंगवा.

प्रश्न ४)आपत्तींची चित्रे ओळखा.

अ) 

----------------------------

ब) 

-----------------------------

**अधिक अभ्यासासाठी लिंक्स:**

https://diksha.gov.in/dial/3Z2MWB

## कृतिपत्रिका : ११

**समजून घेऊ या :** फळांची चव आणि रंग.

**संदर्भ :** इयत्ता दुसरी १.३. फळप्रक्रिया (इयत्ता दुसरीच्या **'खेळू, करु, शिकू'** या पाठ्यपुस्तकातील पृ. क्र. ४७, ४८)

**अध्ययन निष्पत्ती:** अन्न, वस्त्र,निवारा यांच्याशी संबंधित उपक्रमात सहभागी होतो.

**लक्षात घेऊ या :**

आपल्या दैनंदिन आहारात आपण विविध फळांचा समावेश केला पाहिजे.



आपण सर्व प्रकारची फळे आवडीने खाल्ली पाहिजेत.

**रंग व चव:**

फळांची चव वेगवेगळी असते. काही फळे गोड असतात. जसे-चिकू.



तर काही फळे आंबट असतात. जसे -चिंच.



तसेच काही फळे तुरटही असतात. जसे-आवळा.



फळांचा रंगही सारखा नसतो.



कैरीचा रंग हिरवा असतो आणि चव आंबट असते. आंबा चवीला गोड असतो व त्याचा रंग पिवळा असतो. कच्चे केळे, कच्चे टोमॅटो हिरव्या रंगाची असतात. केळे पिकल्यानंतर ते बाहेरून पिवळी दिसतात व चवीला गोड लागतात. तसेच पिकल्यानंतर टोमॅटो चा रंग लाल होतो.

फळांचा उपयोग :

जॅम, जेली, सरबत, मुरंबे, औषधे बनविण्यासाठी फळांचा उपयोग केला जातो.

**सराव करु या :**

प्रश्न १ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१) तुम्हाला माहीत असलेल्या फळांची यादी करा.

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

२) तुमचे आवडते फळ कोणते आहे ?

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

३) कोणत्याही एका फळाचे चित्र काढा आणि त्यात रंग भरा.

प्रश्न २) नावे लिहा.

१) एक बी असणारे फळ ----------------------------------------

२)अधिक बिया असणारे फळ ----------------------------------------

३) बिया नसणारे फळ ----------------------------------------

४) बाहेरून लाल रंगाचे फळ ----------------------------------------

५) चवीला आंबट असणारे फळ ----------------------------------------

६) चवीला गोड असणारे फळे ----------------------------------------

**अधिक अभ्यासासाठी लिंक :**

https://diksha.gov.in/play/content/do_3129315732919336961100

**कृतिपत्रिका : १२**

**समजून घेऊ या :** ऋतू आणि कपडे कपड्यांचे प्रकार व उपयोग.

**संदर्भ :** कापडाच्या विविध प्रकारांची ओळख(इयत्ता दुसरीच्या **'खेळू,करू,शिकू'** या पाठ्यपुस्तकातील पृ.क्र.५० ते ५३)

**अध्ययन निष्पत्ती :** अन्न,वस्त्र व निवारा यांच्याशी संबंधित उपक्रमात सहभागी होतो.

**लक्षात घेऊ या :**



या चित्रातील कपडे कोणत्या प्रकारचे आहेत?

-------------------------

-------------------------

हे कपडे आपण का वापरतो?

-------------------------

-------------------------



कापूस शेतात पिकवतात. कापसापासून सूत काढले जाते. त्याचे कपडे तयार करून आपण अंगात घालतो. ज्यामुळे आपले थंडी, वारा, पाऊस यापासून संरक्षण होते.

प्रत्येक ऋतूनुसार आपण वेगवेगळे कपडे घालतो. सुती कापड, रेशमी कापड, सॅटीन, मखमली कापड व लोकरी कापड असे कापडाचे प्रकार आहेत.

सुती कापड हे मऊ व उबदार असते ते घाम शोषून घेते. या कापडाचा उपयोग धोतर, साडी, पंचा, गणवेश, लहान मुलांचे कपडे, चादरी इ. कपडे तयार करण्यासाठी होतो.



रेशमी कापड हे चमकदार व गुळगुळीत असते. या कापडापासून साडी, मुलांचे ड्रेस, शर्ट, नाटकातील कपडे तयार केले जातात.




लोकरी कापड खरखरीत व मऊ तसेच उबदार असते.यापासून स्वेटर, शाल, मफलर, कानटोपी, मोजे इ. कपडे तयार केले जातात.




**सराव करु या :**

प्रश्न १) उत्तरे लिहा.

१) एका वर्षात कोणकोणते ऋतू आपण अनुभवतो?

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

२) उन्हाळ्यात लोकरी कपडे घातले, तर काय होईल?

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

३) प्राणी कपडे घालत नाही मग थंडीपासून त्यांचे रक्षण कसे होते?

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

४) रेनकोट व छत्रीचा वापर लोक कोणत्या दिवसात करतात?
---------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------

प्रश्न २) यादी करा.

१) तुमच्या परिसरात वापरल्या जाणाऱ्या कपड्यांची यादी करा.
---------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------

२) अभय आणि अजय यांना सहलीकरिता थंड हवेच्या ठिकाणी जायचे आहे. त्यांनी सोबत कोणकोणते कपडे घ्यावे असे तुम्हाला वाटते?
---------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------

प्रश्न ३) हे करा.

१) वेगवेगळ्या प्रकाराच्या कपड्यांचे नमुने गोळा करा.

२) कपड्याच्या दुकानातील तुम्हाला आवडलेल्या एखाद्या कपड्याचे चित्र काढा व रंग भरा.

**अधिक अभ्यासासाठी लिंक्स:**

https://diksha.gov.in/dial/N4AL1G

## कृतिपत्रिका : १३

**समजून घेऊ या** : वासाची व बिनवासाची फुले, फुलांचे रंग,फुलांचे उपयोग.

**संदर्भ :** इयत्ता दुसरीच्या **'खेळू, करू, शिकू'** या पाठ्यपुस्तकातील पृ. क्र. ५८, ६८

**अध्ययन निष्पत्ती:** अन्न, वस्त्र, निवारा यांच्याशी संबंधित उपक्रमात सहभागी होतो.

**लक्षात घेऊ या :**

आपल्या आजूबाजूला विविध प्रकारची फुले आपण पाहतो. काही फुलांना वास असतो, तर काही फुलांना वास नसतो.



**वासाची फुले** :

गुलाब



मोगरा



मोगरा, गुलाब, जाई, जुई, चाफा ही वासाची फुले आहेत.

**बिनवासाची फुले:**

सदाफुली



कर्दळी



सदाफुली व कर्दळी ही बिनवासाची फुले आहेत.

**फुलांचे रंग :**

फुलांचे रंग देखील वेगवेगळे असतात.जास्वंद-लाल, गुलाब-लाल पिवळा पांढरा गुलाबी, मोगरा- पांढरा, झेंडू-पिवळा

**फुलांचे उपयोग :**

सजावटीसाठी, भेट म्हणून देण्यासाठी, गुच्छ तयार करण्यासाठी, हार बनवण्यासाठी, अत्तर बनवण्यासाठी, देवाला वाहण्यासाठी अशा विविध गोष्टींसाठी फुलांचा उपयोग केला जातो.

फुलांचा हार



सजावटीसाठी



पुष्पगुच्छ



**सराव करु या :**

१) तुम्हाला माहीत असलेल्या फुलांची यादी करा.

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

२) तुमचे आवडते फूल कोणते?

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

३) कोणत्याही एका फुलाचे चित्र काढा आणि त्यात रंग भरा.

---------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------

४) परिसरातील फुले आणि पाने यांचा उपयोग करून पुष्पगुच्छ तयार करा.

**अधिक अभ्यासासाठी लिंक:**

https://diksha.gov.in/play/content/do_3129315732919336961100

## कृतिपत्रिका : १४

**समजून घेऊ या :** प्राणी, पाळीव प्राणी, त्यांचे उपयोग.

**संदर्भ :** शेतीपूरक व्यवसाय (इयत्ता दुसरीच्या **'खेळू, करु, शिकू'** या पाठ्यपुस्तकातील पृ.क्र.५९)

**अध्ययन निष्पत्ती :** १) विविध पाळीव प्राणी व पक्षी ओळखतो व त्यांचे उपयोग सांगता येतात.
२) चित्राद्वारे प्राणी व पक्षी यांचे अवयव सांगता येतात.

**लक्षात घेऊ या :** पुढील चित्र ओळखा.



परिसरात विविध प्रकारचे प्राणी आहेत.यातील काही प्राण्यांचा आपल्याला उपयोग होतो. म्हणून काही लोक प्राणी पाळतात. त्यांना आपण **पाळीव प्राणी** म्हणतो. उदा. कुत्रा, गाय, बैल.
कुत्रा घराची राखण करतो.



गाई, म्हशी, शेळ्या दूध देतात.



काहीजण कोंबड्या पाळतात.
मांस, दूध व अंडी हे खाद्यपदार्थ प्राण्यांपासूनच मिळतात.



बैल शेतीच्या कामात मदत करतात.




बैल व घोडा गाडी ओढतात.

काही लोक शेतीसोबत कोंबड्या, बकऱ्या पाळणे हा व्यवसाय करतात. आपण प्राण्यांची काळजी घेतली पाहिजे. जमिनीवर चालणाऱ्या प्राण्यांप्रमाणे काही प्राणी आकाशात उडतात त्यांना आपण पक्षी असे म्हणतो.



कावळा, चिमणी, पोपट, मोर, कबूतर असे विविध पक्षी आहेत.

काही प्राणी पाण्यात राहतात, जसे मासे, कासव, मगर.



माशांना पर असतात. पर असल्यामुळे त्यांना पाण्यात हालचाल करता येते. माशांच्या अंगावर खवले असतात.

**सराव करू या :**

प्रश्न १) कंसातील योग्य शब्द गाळलेल्या जागी भरा.

१) --------------- लोकर देते. (बकरी/मेंढी)

२) --------------- उंदरांचा नाश करतो. (साप/ कुत्रा)

३) प्राणी आपले -------------- आहेत. (मित्र/ शत्रू)

४) मधमाशी ------------------- देते.(दूध/मध)

प्रश्न २) उत्तरे लिहा.

१) आकाशात उडणाऱ्या पक्षांची नावे ------------------------------------------------

२) पाण्यात राहणाऱ्या प्राण्यांची नावे ------------------------------------------------

३) सरपटणारे प्राणी ------------------------------------------------

४) पक्ष्यांना किती पाय असतात? ------------------------------------------------

५) बकरी काय खाते? ------------------------------------------------

६) शिंगे असणाऱ्या प्राण्यांची नावे ------------------------------------------------

प्रश्न ३) जोड्या लावा.



प्रश्न ४) चित्रातील माशाचे विविध अवयव ओळखा.



**अधिक अभ्यासासाठी लिंक्स :**

https://diksha.gov.in/play/collection/do_31277299002216448014275?referrer=utm_source%3Dmobile%26utm_campaign%3Dshare_content&contentId=do_3124870145135984641220

**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे ३०**

**पूर्वतयारी सेतू अभ्यासक्रम चाचणी : ०२** **गुण : १०**

**इयत्ता : तिसरी** **विषय : परिसर अभ्यास भाग १** **वेळ : ३० मिनिटे**

**प्रश्न १) योग्य पर्याय निवडा.** **गुण २**

१) खालील चित्र कशाचे आहे?



१) धरण २) हातपंप ३) पाण्याची टाकी ४) विहीर

२) कुत्रा पाणी कसे पितो?

१) सोंडेने २) पेल्याने ३) जिभेने चाटून ४) चोचीने

**प्रश्न २) चूक की बरोबर ते लिहा.** **गुण २**

१) कावळा काळा असतो. --------------------------

२)फळ पिकले आहे हे त्याच्या रंगावरुन समजते. --------------------------

**प्रश्न ३) जोड्या लावा.** **गुण २**



१) अंडी देते.



२) लोकर देते.

**प्रश्न ४) पुढील संकट आल्यावर काय घडते ते लिहा.** **गुण १**

१) वादळ :

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

**प्रश्न ५) काय करावे बरे?** **गुण १**

१) सदू फुलपाखरांना पकडून दोराला बांधून ठेवतो.

-------------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------------

**प्रश्न ६) आमच्यातून वेगळा ओळखा.** **गुण २**

१)   

२)   

* * *

## कृतिपत्रिका : १९

**समजून घेऊ या :** घर,घराची गरज, प्राणी व त्यांची घरे.

**संदर्भ :** इयत्ता दुसरीच्या '**भाषा**' विषयाच्या पाठ्यपुस्तकातील पृ.क्र.३९ (परिसर समजून घेऊया)

**अध्ययन निष्पत्ती :** अन्न, वस्त्र, निवारा यांच्याशी संबंधित उपक्रमात सहभागी होतो.

**लक्षात घेऊ या :**



थंडी, ऊन, वारा, पाऊस यापासून बचाव व्हावा म्हणून आपण घरात राहतो.

आपल्याप्रमाणे काही प्राण्यांना घराची गरज असते. काही प्राणी स्वतःच स्वतःचे घर तयार करतात. पक्षी घरट्यात राहतात.



मधमाशा पोळे बनवतात.



उंदीर व घुशी जमिनीखाली बिळे तयार करतात.



काही प्राणी आयते घर शोधतात.

वाघ डोंगराच्या गुहेत राहतो.



तर काही प्राण्यांना आपण घर तयार करून देतो.

**सराव करु या**

प्रश्न १) उत्तरे लिहा.

१) पक्षी घरटी बनवण्यासाठी कशाचा उपयोग करतात?

------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------

२) बिळात कोणकोणते प्राणी राहतात?

------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------

३) मुंग्या कशापासून वारूळ बनवत असतील?

------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------

प्रश्न २) खालील प्राणी व त्यांची घरे यांच्या जोड्या लावा.



प्रश्न ३) काय म्हणतात?

१) घोड्यांच्या घराला ----------------------------------------

२) कोंबड्यांच्या घराला ----------------------------------------

प्रश्न ४) कोठे राहतात ते लिहा.



१) ----------------------



२) -------------------



३) -----------------------

**अधिक अभ्यासासाठी लिंक्स :**

https://youtu.be/fYddUK14JAA

## कृतिपत्रिका : १६

**समजून घेऊ या :** माहिती व संप्रेषण साधने, संगणकाचे भाग.

**संदर्भ :** तंत्रज्ञान क्षेत्र (इयत्ता दुसरीच्या '**खेळू, करू, शिकू**' या पाठ्यपुस्तकातील पृ.क्र.६०) आणि संगणकाच्या करामती (इयत्ता दुसरीचा **भाषा विषयाचा** पाठ)

**अध्ययन निष्पत्ती :** संगणकाचे विविध भाग ओळखून बाह्य भागांची हाताळणी करतो.

**लक्षात घेऊ या :**



बाजूच्या चित्रातील आजोबा वर्तमानपत्र वाचत आहेत. बाबा बोलण्यासाठी मोबाईलचा वापर करत आहेत. ताई माहिती मिळवण्यासाठी संगणकाचा वापर करत आहे. पत्र, संगणक, मोबाईल, वर्तमानपत्र, टीव्ही ही सर्व साधने माहिती व निरोप मिळवण्यासाठी किंवा पाठवण्यासाठी वापरली जातात यांना **माहिती व संप्रेषण साधने** म्हणतात.




मॉनिटर, सी.पी.यू., कीबोर्ड, माऊस, प्रिंटर व स्पीकर हे संगणकाचे विविध भाग आहेत.




**सराव करू या:**

प्रश्न १) उत्तरे लिहा.

१) टेलिफोनचे कोणकोणते फायदे आहेत?

------------------------------------------------ ------------------------------------

------------------------------------------------ ------------------------------------

२)वर्तमानपत्रामुळे कोणती माहिती मिळते?

------------------------------------------------ ------------------------------------

------------------------------------------------ ------------------------------------

३) संगणकाचा वापर कोठे केला जातो ?

------------------------------------------- ----------------------------------

------------------------------------------- ----------------------------------

४) पूर्वी निरोप कसे पोचवले जात असत ?

------------------------------------------- ----------------------------------

------------------------------------------- ----------------------------------

प्रश्न २) हे करा.

१) एका पोस्टकार्डावर मजकूर लिहा व ते तुमच्या नातलगाला पाठवा.

२) तुमचा घरचा पत्ता व्यवस्थित लिहा व तो आईला दाखवा.

प्रश्न ३) कोण ते लिहा.

१) अधिक वेगाने काम करणारे यंत्र -------------------------------------

२) गाणे ऐकवतो. -------------------------------------

३) टाईप करतो. -------------------------------------

४) माहिती साठवतो. -------------------------------------

५) चित्र दाखवतो. -------------------------------------

**उपक्रम :**

१)संगणकाचे चित्र काढा व रंगवा.

२)संगणकाविषयी अधिक माहिती मिळवा.

**अधिक अभ्यासासाठी लिंक्स:**

१)https://diksha.gov.in/dial/ZZWFQC

२)https://diksha.gov.in/play/collection/do_31281621174018867214627?referrer=utm_source%3Dmobile%26utm_campaign%3Dshare_content&contentId=do_31288133580875366414

## कृतिपत्रिका : १७

**समजून घेऊ या :** वाहतुकीची साधने, वाहतुकीचे नियम.

**संदर्भ :** वाहने, इयत्ता दुसरीच्या'**खेळू,करू,शिकू'** या पाठ्यपुस्तकातील क्र.७९)

**अध्ययन निष्पत्ती :** वाहतुकीचे नियम समजून घेतो.

**लक्षात घेऊ या :**

पूर्वीच्या काळी जेव्हा वाहने नव्हती तेव्हा लोक एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी पायी जात असत. कालांतराने व्यक्ती,वस्तू किंवा माल एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी वाहून नेण्यासाठी काही साधने तयार केली, त्यांना आपण वाहने म्हणतो.

**वाहने :**



बैलगाडी



घोडागाडी



ट्रक



जीप



बस



रिक्षा



मोटारसायकल

परिसरात रस्त्यावरून, आकाशातून, पाण्यातून जाणारी विविध वाहने आपल्याला पाहावयास मिळतात. ही आपली वाहतुकीची साधने आहेत.

वाहतुकीचे काही नियम आहेत.

१) रस्ता ओलांडताना झेब्रा क्रॉसिंगचा वापर करावा.



२) रस्त्यावरील सिग्नल कडे लक्ष द्यावे. सिग्नल मधील लाल दिवा लागल्यावर थांबावे. पिवळा दिवा लागल्यावर रस्त्याच्या दोन्ही बाजूला बघावे. हिरवा दिवा लागल्यावर पुढे जावे.



३) रस्त्याच्या डाव्या बाजूने चालावे.

**सराव करु या :**

१) एका देशातून दुसऱ्या देशात जाण्यासाठी कोणत्या साधनाचा वापर केला जातो?

----------------------------------------------------------------------------------------

२) तुम्ही शाळेत कशाने जाता?

----------------------------------------------------------------------------------------

प्रश्न २) माहिती मिळवा



अ) हे चित्र कशाचे आहे आणि त्याचा वापर कोठे केला जातो?

----------------------------------------------



ब) हे चित्र कशाचे आहे आणी हे वाहन कशावरून धावते?

--------------------------------------------

प्रश्न ३) वाहनांच्या चित्रांचा संग्रह करा आणि ती चित्रे वहीत चिकटवा.

प्रश्न ४) रस्त्यावरील सिग्नलचा पुढील दिवा काय सांगातो?

१) लाल दिवा --------------------------------------------------------------------

२)पिवळा दिवा --------------------------------------------------------------------

३)हिरवा दिवा --------------------------------------------------------------------

प्रश्न ९) खालील वाहतुकीची साधने व ती कशावरून जातात याच्या जोड्या लावा.



**अधिक अभ्यासासाठी लिंक :**

https://diksha.gov.in/play/content/do_31292737537117388811408

## कृतिपत्रिका : १८

**समजून घेऊ या :** वाढ, वनस्पतींमधील वाढ, बाळाची वाढ, प्राण्यांमधील वाढ.

**संदर्भ :** इयत्ता पहिलीच्या **'खेळू,करु,शिकू'** या पाठ्यपुस्तकातील पृ.क्र. ५१

**अध्ययन निष्पत्ती :** अन्न, वस्त्र, निवारा यांच्याशी संबंधित उपक्रमात सहभागी होतो.

**लक्षात घेऊ या :**

कथाकथन



राजू नावाचा मुलगा होता.



एकदा आईने त्याला आंबा खायला दिला.



आंबा खाऊन, झाल्यावर राजूने अंगणात एक खड्डा खोदला आणि तेथे आंब्याची बी लावली.



दररोज नियमित पाणी दिल्याने तेथे एक रोपटे उगले. काही वर्षांनी रोपट्याचे मोठे झाड बनले. त्याबरोबरच छोटासा राजूही मोठा झाला.



याचप्रमाणे काळानुसार माणसात बदल होत असतात.घरात जन्माला आलेले इवलेसे बाळ हळूहळू वाढत असते.



प्राण्यांतही असेच बदल होत असतात.
जन्मानंतर छोटेसे पिलू हळूहळू मोठे होऊ लागते.



शरीराच्या वाढीसाठी अन्नाची गरज असते.

**सराव करु या :**

प्रश्न १) उत्तरे लिहा

१) कुंडीतील रोप सुकले आहे. तुम्ही काय कराल?

-----------------------------------------------------------------------

२) तान्ह्या बाळाची वाढ होण्यासाठी तुम्ही त्याला काय खायला द्याल?

-----------------------------------------------------------------------

३) चित्रातील बाळाला तुम्ही खालील शर्ट घालणार का? कारण सांगा.





-----------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

४) अनेक बिया असणारे फळ कोणते?

-----------------------------------------------------------------------

प्रश्न २)आंब्याच्या बीचे चित्र काढा व रंग भरा.

प्रश्न ३) वाढीनुसार योग्य क्रम द्या.

बाळाच्या वाढीला









------------ ------------ ------------- -------------

**अधिक अभ्यासासाठी लिंक्स:**

https://diksha.gov.in/play/collection/do_31277299002216448014275?referrer=utm_source%3Dmobile%26utm_campaign%3Dshare_content&contentId=do_31244591334832537615780

## कृतिपत्रिका : १९

**समजून घेऊ या :** परिसरातील वनस्पती व पिके.

**संदर्भ :** इयत्ता दुसरी बालभारती २.१

**अध्ययन निष्पत्ती :** अन्न, वस्त्र,निवारा यांच्याशी संबंधित उपक्रमात सहभागी होतो.

**लक्षात घेऊ या :**

वनस्पती म्हणजे लहान-मोठी सर्व प्रकारची झाडे. आपल्या परिसरात विविध झाडे आहेत. वनस्पतींपासून आपल्याला धान्य मिळते. उदाहरण - गहू, तांदूळ, ज्वारी, बाजरी, इ.



कडधान्ये : हरभरा, तूर, मूग, वाटाणा यांसारखी कडधान्ये मिळतात.



वनस्पती पासून फळे मिळतात. भाज्या मिळतात.



नारळाचे झाड उंच असते. नारळाच्या झाडाच्या पानांना झावळ्या म्हणतात. झावळीच्या खाचेत नारळ लटकलेले असतात. नारळाच्या झाडाला माड असेही म्हणतात.



बांबूच्या झाडापासून झाडू, टोपली, सुपडे, शोभेच्या व इतर वस्तू तयार करतात.



वनस्पतींपासून फुले, फळे, औषधे, लाकूड, सावली मिळते. वनस्पतींपासून मसाल्याचे पदार्थ, तेल मिळते. आपल्याला अन्नासाठी, कपड्यांसाठी व घरांसाठी वनस्पती अतिशय उपयोगी असतात. वनस्पतींची लागवड करावी व त्यांची काळजी घ्यावी. विनाकारण वनस्पतींचा नाश करु नये.

**सराव करु या :**

१) नारळाच्या झाडापासून आपणास काय मिळते?

-----------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

२) तुमच्या शेतात कोणकोणती पिके घेतली जातात?

-----------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

३) शेतकरी शेतात कोणकोणती कामे करतो?

-----------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

प्रश्न २) योग्य जोड्या लावा

| अ गट | ब गट |
|---|---|
| 1) ज्वारी | अ) फळ |
| 2) मुग | ब) भाजी |
| 3) मोसंबी | क) धान्य |
| 4) मेथी | ड) कडधान्य |

प्रश्न ३) ठळक अक्षरातील नको ते शब्द खोडा.

१) बटाटा ही **कंदभाजी/पालेभाजी** आहे.

२) मोगरा ही सुवासिक वनस्पती **आहे/नाही**.

३) **तीळ/लवंग** ही मसाल्याची वनस्पती आहे.

४) **तुळस/कापूस** ही औषधी वनस्पती आहे.

५) ऊसापासून **तेल/साखर** मिळते.

**अधिक अभ्यासासाठी लिंक्स :**

https://diksha.gov.in/play/content/do_3128820156368814081839

# कृतिपत्रिका : २०

**समजून घेऊ या :** दिनदर्शिका.

**संदर्भ :** इयत्ता दुसरीच्या भाषा विषयातील 'पाठ क्रमांक १७ दिनदर्शिका'.

**अध्ययन निष्पत्ती :** परिसरातील उपलब्ध साहित्यापासून आधुनिकतेशी सांगड घालून अभिरुचीनुसार साहित्य तयार करतो.

**लक्षात घेऊ या :**




हे चित्र कसले आहे?

------------------------------------

ही वस्तू तुम्ही कुठे पाहिली आहे?

------------------------------------

आपल्या घरी अशी दिनदर्शिका असते. यातून आपल्याला वर्ष, महिने, वार व दिनांक या विषयी माहिती मिळते. दिनदर्शिकेत विविध सण-उत्सव, थोर व्यक्तींची जयंती, पुण्यतिथी असे दिनविशेष दिलेले असतात दिनदर्शिका वाचून आपल्याला याविषयी माहिती मिळते. **दिनदर्शिका म्हणजेच कॅलेंडर.**

**सराव करू या :**

प्रश्न १) पहा, वाचा व उत्तरे लिहा.




१) ऑगस्ट महिन्याचे एकूण दिवस किती?

------------------------------------

२) ऑगस्ट महिन्यात आलेले सण कोणते?

------------------------------------

३) ऑगस्ट महिन्यात आलेले एकूण रविवार किती?

------------------------------------

४) ऑगस्ट महिन्यात पाच वेळा आलेले वार कोणते?

------------------------------------

प्रश्न २) इंग्रजी महिने शोध व लिही.

| | | | |
|---|---|---|---|
| जा | अ | मा | र्च |
| ने | ए | प्रि | ल |
| वा | डि | फे | जू |
| री | सें | ब्रु | न |
| जु | ब | वा | मे |
| लै | र | री | क |

| |
|---|
| |
| |
| |
| |
| |
| |

प्रश्न ३) पुढील महिन्यातील पहिल्या आठवड्यात काय काय करशील ते दिनदर्शिका पाहून आईला सांग.

प्रश्न ४) दिनदर्शिकेचे चित्र काढा किंवा दिनदर्शिका तयार करा.

**अधिक अभ्यासासाठी लिंक:**
https://diksha.gov.in/play/content/do_3129025945734266881739

## कृतिपत्रिका : २१

**समजून घेऊ या :** गावाची ओळख.

**संदर्भ :** इयत्ता दुसरी - बालभारती पाठ क्र.१४ झरीपाडा.

**अध्ययन निष्पत्ती :** अन्न, वस्त्र,निवारा यांच्याशी संबंधित उपक्रमात सहभागी होतो.

**लक्षात घेऊ या :**

खालील प्रश्न वाचा व उत्तरे लिहा.

अ) तुम्ही कोणत्या गावात राहतात?

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

ब) तुमच्या गावाशेजारील गावांची नावे लिहा.

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------



हे चित्र कशाचे आहे?

------------------------

काही गावे नदीच्या किंवा ओढ्याच्या काठावर वसलेली असतात. काही गावांच्या आजूबाजूला डोंगर, लहान मोठ्या टेकड्या असतात. गावातील घरे मातीची बनलेली असतात. गावांमध्ये आपल्याला गाई,म्हशी,कोंबड्या, बकऱ्या इ.जनावरे बघायला मिळतात. गावात पायवाटा असतात. गावाला लागून एखाद-दुसरा कच्चा रस्ता असतो,त्यावरुन माणसांची ये-जा चालते. बैलगाड्या,सायकली व एखादी मोटार त्यावरुन जाते.गावाजवळून एखादा पक्का रस्ता जातो त्यावरुन एस.टी.गाड्या, ट्रक व इतर वाहने धावतात. गावाच्या परिसरात शेते असतात. शेतकरी शेतातून अनेक पिके काढतात. गावात प्राथमिक शाळा असतात. मोठ्या गावात ग्रामपंचायत व आरोग्य केंद्र ही असते.



**सराव करु या :**

१) तुमच्या गावाचे वर्णन करा.

-------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------



२) हे चित्र कशाचे आहे?

---------------------------------

---------------------------------

---------------------------------

---------------------------------

३) तुम्हाला कुठे राहायला आवडेल गावात की शहरात? का?

-------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------

४) तुम्हाला माहिती असलेल्या शहरांच्या नावांची यादी करा.

-------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------

५) खालील गोष्टी कुठे पाहायला मिळतील ते लिहा.

अ. ग्रामपंचायत ----------------------

ब. रेल्वे ----------------------

क. मोठा दवाखाना ----------------------

ड. कारखाना ----------------------

६. गावातील लोक शहरात कोणत्या कारणासाठी जातात?

-------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------

**अधिक अभ्यासासाठी लिंक :**

https://diksha.gov.in/play/content/do_31287636425807462412024

# कृतिपत्रिका : २२

**समजून घेऊ या :** आपला भारत.

**संदर्भ :** इयत्ता दुसरी बालभारती 'पाठ २१'

**अध्ययन निष्पत्ती :** परिचित-अपरिचित मजकूरा मध्ये रस घेतात.गप्पागोष्टी करतात आणि त्यांचे अर्थ शोधण्यासाठी विविध युक्त्यांचा वापर करतात.

**लक्षात घेऊ या :**



भारत माझा देश आहे. मी भारतीय आहे.

तिरंगा



तिरंगा हा भारताचा राष्ट्रध्वज आहे.

मोर-



मोर हा भारताचा राष्ट्रीय पक्षी आहे.

वाघ-



वाघ हा भारताचा राष्ट्रीय प्राणी आहे.

हिमालय पर्वत-



हिमालय हा भारतातील सर्वात उंच पर्वत आहे.

दिल्ली-



दिल्ली ही भारताची राजधानी आहे.



भारतात विविध भाषा बोलणारे लोक आहेत. त्याचप्रमाणे लोकांच्या पोषाखात, अन्नात विविधता आहे.



परंतु सर्व लोक आपसात मिळून-मिसळून एकतेने राहतात.

आपल्या भारताच्या इतिहासातील काही महत्त्वाचे दिवस आपण सण म्हणून साजरे करतो. त्यांना राष्ट्रीय सण म्हणतात. दरवर्षी १५ ऑगस्ट हा दिवस आपण स्वातंत्र्य दिन म्हणून साजरा करतो.



त्याचप्रमाणे २६ जानेवारी हा दिवस प्रजासत्ताक दिन म्हणून आपण साजरा करतो.

आपल्या देशात अनेक धर्माचे लोक राहतात. ते आपापले सण साजरे करतात. होळी, रक्षाबंधन, दसरा, गुढीपाडवा, गणेश चतुर्थी असे विविध सण साजरे केले जातात.

**दिवाळी:**



दिवाळी हा दिव्यांचा सण मोठ्या आनंदाने साजरा केला जातो.

**रमजान ईद:**



या सणाच्या दिवशी मुसलमान लोक मशिदीत नमाज पढतात. 'ईद मुबारक' म्हणून एकमेकांना शुभेच्छा देतात.

**गुरुनानक जयंती:**



गुरु नानकांनी शीख धर्म स्थापन केला म्हणून गुरु नानक यांचा जन्म दिवस शीख लोक मोठ्या आनंदाने साजरा करतात.

**नाताळ:**



येशू ख्रिस्तांनी ख्रिश्चन धर्म स्थापन केला. येशू ख्रिस्तांचा जन्मदिवस नाताळ म्हणून मोठ्या थाटामाटाने साजरा केला जातो.

असे विविध धर्माचे कितीतरी सण आपल्या देशात उत्साहाने साजरे केले जातात.

**सराव करू या:**

१) तुम्हाला माहीत असलेल्या शहरांची यादी करा.

--------------------------------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------------------------------

२) तुमचा सगळ्यात आवडता प्राणी कोणता?

--------------------------------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------------------------------

३) मोराविषयी माहिती लिहा.

--------------------------------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------------------------------

४) तिरंग्याचे चित्र काढून त्याला रंग द्या.

५) आपल्या आजूबाजूचे लोक कोणकोणते सण साजरे करतात याची माहिती मिळवा.

**अधिक अभ्यासासाठी लिंक:**

१)https://diksha.gov.in/play/content/do_31258414686762598411469 8

२)https://diksha.gov.in/play/collection/do_3128162117401886721462 7?referrer=utm_source%3Dmobile%26utm_campaign%3Dshare_content&contentId=do_3128820156368814081839

**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे ३०**

**पूर्वतयारी सेतू अभ्यासक्रम चाचणी : ०३** **गुण : १०**

**इयत्ता : तिसरी** **विषय : परिसर अभ्यास भाग १** **वेळ : ३० मिनिटे**

**प्रश्न १) काय करावे बरे?** **गुण २**

१) सुरीने भाजी कापतांना आईचे बोट कापले.

२) सईला अंगणात सुंदर वास असणाऱ्या फुलांची झाडे लावायची आहेत. तिने कोणती झाडे लावावीत ते सुचवा.

**प्रश्न २) जोड्या लावा.** **गुण २**



१) हात धुण्यासाठी



२) मातीकाम

**प्रश्न ३) परिसर स्वच्छ केल्यानंतर गोळा झालेल्या कचऱ्यात केळीचे साल, चॉकलेटचे कागद, खोके, झाडाची कोरडी पाने, निवडलेल्या मेथीच्या भाजीच्या काड्या, पेनाचे टोपण असा कचरा गोळा झाला. यातून ओला कचरा व सुका कचरा वेगळा करण्यासाठी विवेकला मदत करा.** **गुण ३**

| सुका कचरा | ओला कचरा |
|---|---|
| | |

**प्रश्न ४) योग्य पर्याय निवडा.** **गुण २**

१) -------- जॅम, जेली, सरबते, गोळ्या तयार करतात.

अ)बियांपासून आ)फळांपासून इ)पानांपासून ई)फुलांपासून

२) रस्त्यावरील सिग्नलचा कोणता दिवा लागला की वाहने थांबतात?

अ)हिरवा आ)पिवळा इ)लाल ई)निळा

**प्रश्न ५) चूक की बरोबर ते लिहा.** **गुण २**

१) चिमणीच्या अंगावर खवले असतात. --------------------------

२) कापसाच्या बी ला आठोळी म्हणतात. --------------------------

**प्रश्न ६) आमच्यातून वेगळा ओळखा.** **गुण ४**

१) 

२) 

३) 

४) 

**प्रश्न ७) सुमितने लावलेल्या रोपाला काही दिवस पाणी न दिल्याने रोप सुकले.** **गुण २**



यावरुन त्याच्या लक्षात आले की झाडांना ----------------------

तुम्ही एक रोप लावा. त्या रोपाची तुम्ही काळजी कशी घ्याल?

-----------------------------------------------

**प्रश्न ८) चित्रात दिलेल्या प्राण्यांच्या अवयवावरुन तो प्राणी/पक्षी कोणता हे ओळखा.** **गुण २**






------------------------------------------------------------

**प्रश्न ९) चित्रात दिलेल्या पानावरुन ते कोणत्या झाडाचे ते ओळखा.** **गुण १**




-----------------------------------------------------------------------

* * *